follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड www.rajdand.com

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

* RNI Regd. No. 72105/99 * वर्ष २५, अंक १८९ सातारा, रविवार, १७ मार्च, २०२४ * पाने ८ (सुप्रभात) किंमत रू ५/-

# मतदानाचा मुहूर्त ठरला

## ४ जूनला होणार फैसला!देशात ७ तर महाराष्ट्रात ५ टप्प्यांत होणार मतदान

**नवी दिल्ली :** अवघ्या जगाचे लक्ष लागलेल्या देशाच्या अठराव्या लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजला असून ५४३ जागांसाठी १९ एप्रिल ते १ जून या काळात सात टप्प्यांमध्येमतदानाचामहामहोत्सव पार पडणार आहे. ९७ कोटी मतदार देशात सत्तेत कोण असेल, याचा फैसला घेईल आणि त्याचा निकाल लागेल तो ४ जून रोजी. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाजपचे इलेक्शन मॅनेजमेंट, लोकप्रियता अन् दुसरीकडे राहुल गांधी यांच्यासोबत असलेल्या इंडिया आघाडीची एकमूठ यांची आजपासून ८३ दिवस सत्वपरीक्षा होणार आहे.-

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दुपारी ३ वाजता लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. आम्ही प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी मेहनत घेतोय, तुम्हीहीमतदानासाठीया, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी ४ राज्यांतील विधानसभा व विविध राज्यांतील विधानसभेच्या २६ जागांसाठी पोटनिवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले.



### लोकशाहीचा महोत्सव

* १९ एप्रिलला पहिला तर १ जूनला अंतिम टप्पा
* दिव्यांग, ८५ वर्षांवरील ज्येष्ठांसाठी घरून मतदानाची सोय
* मतदान केंद्रांवर स्वयंसेवक, व्हीलचेअर्स
* मनी पॉवरचा वापर रोखण्यासाठी कठोर उपाययोजना
* राजकीय पक्ष आणि वाचाळवीरांसाठी नियमावली जाहीर
*अफवा, चुकीची माहिती पसरविल्यास कठोर कारवाई
* तक्रार मिळताच १०० मिनिटांत पथक पोहोचेल घटनास्थळी
* १२ राज्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिला मतदार जास्त
* आंध्र प्रदेश, ओडिशा, अरुणाचल, सिक्कीममध्ये सोबतच विधानसभाही

लोकसभा निवडणुकीच्या घोषणेबरोबरच संपूर्ण देशभरात आदर्श निवडणूक आचारसंहिता लागू झाली असून, आता खऱ्या अर्थाने रणधुमाळीला सुरुवात झाली असून, कोणाची लाट येते आणि कोणाला न्यायफ मिळतो, हे ४ जूनला समजेल.

**मतदान कधी होणार, कुठे मतदान?**

**टप्पा १** - १९ एप्रिल - राज्य २१ / केंद्रशासित प्रदेश१०२राज्य आणि मतदारसंघ -महाराष्ट्र - ५ , मध्य प्रदेश - ६, छत्तीसगड - १, तामिळनाडू - ३९, लक्षद्वीप - १, राजस्थान - १२, उत्तराखंड - ५, उत्तर प्रदेश - ८, जम्मू-काश्मीर - १, पश्चिम बंगाल - ३, सिक्किम - १, मेघालय - २, अरुणाचल प्रदेश - २, नागालँड -१, मणिपूर - २, मिझोराम - १, त्रिपुरा -१, आसाम - ५, बिहार - ४, अंदमान आणि निकोबार - १, पुडुच्चेरी - १.

**टप्पा २-** २६ एप्रिल - राज्य १३ / केंद्रशासित प्रदेश ८९ राज्य आणि मतदारसंघ -महाराष्ट्र - ८, मध्य प्रदेश - ७, छत्तीसगड - ३, केरळ - २०, कर्नाटक - १४, राजस्थान - १३, जम्मू-काश्मीर - १, उत्तर प्रदेश - ८, बिहार - ५, पश्चिम बंगाल - ३, आसाम - ५, मणिपूर - १, त्रिपुरा - १.

**टप्पा ३-** ७ मे - राज्य १२ / केंद्रशासित प्रदेश९४राज्य आणि मतदारसंघ -महाराष्ट्र - ११, गोवा - २, कर्नाटक - १४, गुजरात - २६, दादरा आणि नगर हवेली व दमण आणि दीव - २, मध्य प्रदेश - ८, छत्तीसगड - ७, उत्तर प्रदेश - १०, जम्मू-काश्मीर - १, बिहार - ५, पश्चिम बंगाल - ४, आसाम - ४.

**टप्पा ४-** १३ मे - राज्य १० / केंद्रशासित प्रदेश ९६राज्य आणि मतदारसंघ -महाराष्ट्र - ११, मध्य प्रदेश - ८, तेलंगणा - १७, आंध्र प्रदेश - २५, ओडिशा - ४, जम्मू-काश्मीर - १, उत्तर प्रदेश - १३, बिहार - ५, झारखंड - ४, पश्चिम बंगाल - ८.

# बारामती, शिरूरसाठी अजितदादांची फिल्डिंग



**पुणे :** महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांत मुलभूत सोयीसुविधांसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ११ मार्चला १८ जणांची समिती स्थापन करण्यात आली होती. त्यामध्ये शनिवारी आणखी नऊ लोकप्रतिनिधींची भर पडली. समितीमधील बहुतांशी सदस्य हे राष्ट्रवादी काँग्रेसचे असल्याने बारामती, शिरूरमध्ये त्याचा फायदा पक्षाला मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडून एक गट वेगळा झाला आहे. या पार्श्वभूमीवर आगामी लोकसभा निवडणुकीत महायुतीचा उमेदवार निवडून येण्यासाठी महायुतीमधील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या लोकप्रतिनिधींची समाविष्ट गावांतील सुविधांसाठीच्या समितीमध्ये निवड करण्यात आली आहे.पुणे महापालिकेच्या हद्दीत शहरालगतची बहुतांशी गावे ३४ गावे ही बारामती आणि शिरूर मतदारसंघातील आहेत.

महारपालिका सदस्यांची मुदत संपुष्टात आली असून प्रशासकराज सुरू आहे. त्यामुळे ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर समाविष्ट गावातील निवासी आणि बिगरनिवासी मिळकतींना दहापटीने आकारल्या जाणाऱ्या कराला स्थगिती देण्यात आली आहे. मिळकत करावरील दंड वसुलीला तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला.आणखी वाचा-महायुतीच्या बारामतीमधील बैठकीला हर्षवर्धन पाटील, शिवतारेंची दांडीविभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली १८ लोकप्रतिनिधींची निवड करण्यात आली असली, तरी यामध्ये सर्वाधिक लोकप्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आहेत.

कारण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटीनंतर लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते स्थानिक नेत्यांमध्ये शरद पवार कीअजित पवारयांच्या गटात जायचे? यावरून संभ्रम आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात पवार कुटुंबातच प्रमुख लढत होत आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांना आपल्या बाजुने वळविण्यासाठी दोन्ही गटांकडून प्रयत्न केले जात आहेत. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ग्रामीण भागातील संभ्रमावस्थेतील पदाधिकाऱ्यांना समाविष्ट गावांच्या विकासासाठी लोकप्रतिनिधी म्हणून नियुक्त करून आपसुक आपल्याकडे वळविल्याचे बोलले जात आहे.




# एक देश, एक निवडणूक

आपल्या देशात कायम कुठे ना कुठे निवडणुका सुरू असतात. विविध कार्यकारी सहकारी संस्था, सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, ग्रामपंचायती, नगरपालिका, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा अशा विविध निवडणुकांत आपले प्रशासन, पोलिस, राजकारणी गुंतलेले असतात. निवडणुकीच्या सर्वेक्षणापासून मतमोजणीपर्यंत शिक्षकही त्यात गुंतलेले असतात. शिवाय निवडणुकीच्या नावाखाली आचारसंहिता लागली, की मग प्रशासनाला काम न करण्यासाठी कारण मिळते. वेगवेगळ्या वेळी निवडणुका, त्यावर होणारा खर्च, ठप्प होणारा विकास हे आपल्यासारख्या देशाला परवडणारे नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिली दहा वर्षे लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी होत होत्या. नंतर अविश्वास ठराव, राजकारणासाठी सरकार बरखास्त करण्याचे प्रकार सुरू झाले. त्यामुळे निवडणुका एकाचवेळी घेण्याला अडथळे आले. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने आणलेली ङ्गवन नेशन, वन इलेक्शनफ्ही संकल्पना अतिशय चांगली आहे. या संकल्पनेला ३२ राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला आहे आणि १५ राजकीय पक्षांनी विरोध केला असला, तरी राहिताच्या मुद्यावर मतभेद विसरून सर्वांना एकत्र आणले पाहिजे. त्यासाठी सरकारनेही राजकारण बाजूला ठेवून सहमतीचे राजकारण केले पाहिजे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिलेल्या अहवालात पंचायती, नगरपालिका, महानगरपालिका, विधानसभा आणि लोकसभेचा उल्लेख केला असला, तरी त्यात सर्वंच प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था, गृहनिर्माण संस्था, साखर कारखाने, सूतगिरण्या, बाजार समित्या, सहकारी बँका, विविध कार्यकारी संस्था, पतसंस्था, पणन संस्था, पाणीवापर संस्थांसह ज्या ज्या ठिकाणी निवडणुका घ्याव्या लागतात, अशा सर्वंच संस्थांचा समावेश करायला हवा. पाच वर्षे कायम निवडणुका होत राहण्यापेक्षा चार-पाच महिन्यात सर्वंच निवडणुका पार पाडण्यासाठी कालबद्ध काळात निवडणुकीचा कार्यक्रम आखला पाहिजे. त्यानंतर निवडणूक हा विषय बंद करून राहिलेल्या साडेचार वर्षांत केवळ विकास आणि विकास एवढाच विचार करायला हवा. कोविंद यांच्या समितीच्या अहवालातील या त्रुटी दूर करून ङ्गवन नेशन, वन इलेक्शनफ ही संकल्पना प्रत्यक्षात आणायची असेल, तर देशातील निवड़णुका होणाऱ्या सर्वांचा त्यात विचार करायला हवा. एकावेळी अनेक निवडणुका घेण्यासाठी ईव्हीएममध्ये काही बदल करण्याची आवश्यकता असेल, तर तसे करायलाही काही हरकत नसावी. सहकारी संस्थांच्या निवडणुकीत मतदार जसे एकाचवेळी २०-२२ लोकांना मतदान करीत असतात, तसे विधानसभा, लोकसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत करता आले, तर अधिक चांगले होईल. सहकारी आणि अन्य संस्थांच्या निवड़णुका संसदीय निवडणुकीनंतरच्या शंभर दिवसांत घेतल्या गेल्या पाहिजेत. मतदान गतीमान करण्यासाठी आणि एकाचवेळी पाच-सहा मतदान करण्यासाठीचे प्रोग्राम ईव्हीएममध्ये भरता येतील. कोविंद यांच्या नेतृत्वाखालील समितीने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना १८ हजारांहून अधिक पानांचा अहवाल सादर केला. या उच्चस्तरीय समितीने लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची शिफारस केली आहे. त्यानंतर शंभर दिवसांत स्थानिक नगरपालिकांच्या निवडणुका घेता येतील, असेही सांगितले. कोणत्याही राज्यात त्रिशंकू किंवा अविश्वास प्रस्ताव किंवा अशी कोणतीही परिस्थिती असल्यास तिथे लोकसभेच्या मुदतीपर्यंतच्या कालावधीसाठी नव्याने निवडणुका घेतल्या जाऊ शकतात. अशी व्यवस्था लागू करण्यासाठी घटनेच्या कलम ८३ (संसदेच्या सभागृहांचा कालावधी) आणि कलम १७२ (राज्य विधानमंडळांचा कालावधी) मध्ये सुधारणा करावी लागेल. या घटनादुरुस्तीला राज्यांनी मान्यता देण्याची गरज भासणार नाही, असे समितीने म्हटले आहे. निवडणूक आयोगाने राज्य निवडणूक अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून एकच मतदार यादी आणि मतदार ओळखपत्र तयार करण्याची शिफारसही समितीने केली आहे. यासाठी मतदार यादीशी संबंधित कलम ३२५ मध्ये सुधारणा करता येईल. सध्या निवडणूक आयोग लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेतो, तर नगरपालिका आणि पंचायत निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगांवर असते. राष्ट्रीय पक्षांमध्ये काँग्रेस, आम आदमी पक्ष (आप), बहुजन समाज पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पक्षांव्यतिरिक्त ङ्गऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटफ, तृणमूल काँग्रेस, ङ्गऑल इंडिया मजलिस-ए- इत्तेहादुल मुसलमीनफ (एआयएमआयएम), भारतीय कम्युनिस्ट पक्ष, द्रमुक, नागा पीपल्स फ्रंट, समाजवादी पक्ष, सीपीआय (एमएल) लिबरेशन आणि ङ्गसोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाफने विरोध केला. राष्ट्रीय लोक जनता दल, भारतीय समाज पक्ष, ङ्गगोरखा नॅशनल लिबरल फ्रंटफ, ङ्गहिंदुस्थानी अवाम मोर्चाफ, राष्ट्रीय लोक जनशक्ती पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार), भाजप, ङ्गनॅशनल पीपल्स पार्टीफ (एनपीपी), ङ्गएआयएडीएमकेफ, ङ्गऑल झारखंड स्टुडंट्स युनियनफ, अपना दल (सोनेलाल), आसाम गण परिषद, बिजू जनता दल, लोक जनशक्ती पक्ष (रामविलास), मिझो नॅशनल फ्रंट, ङ्गराष्ट्रवादी डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टीफ, संयुक्त जनता दल, सिक्कीम क्रांतीकारी मोर्चा, शिरोमणी अकाली दल आणि ङ्गयुनायटेड पीपल्स पार्टी लिबरलफ यांनी या संकल्पनेला पाठिंबा दिला. भारत राष्ट्र समिती, ङ्गइंडियन युनियन मुस्लिम लीगफ, ङ्गनॅशनल कॉन्फरन्सफ, धर्मनिरपेक्ष जनता दल, झारखंड मुक्ती मोर्चा, केरळ काँग्रेस (एम), शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, राष्ट्रीय जनता दल, राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्ष, क्रांतिकारी समाजवादी पक्ष, ङ्गसिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंटफ, तेलुगु देसम पार्टी आणि वायएसआर काँग्रेस पक्षाने प्रतिक्रिया दिली नाही. अर्थात आता यापैकी अनेक पक्षांची भूमिका बदललेली असेल. जगातील अनेक देशांमध्ये एकाच वेळी निवडणुका होतात. स्वीडनमध्ये दर चार वर्षांनी सार्वत्रिक निवडणुकांसोबत राज्य आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेतल्या जातात. याशिवाय दक्षिण आफ्रिकेत देशाच्या आणि राज्यांच्या निवडणुका एकाच वेळी होतात. या निवडणुकांदरम्यान मतदारांना वेगवेगळी मतदानाची कागदपत्रेही दिली जातात. ब्राझील, फिलीपिन्स, बोलिव्हिया, कोलंबिया, कोस्टा रिका, ग्वाटेमाला, गयाना आणि होंडुरास या जगातील इतर देशांमध्ये अध्यक्षीय आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्या जातात. देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेतल्याने निवडणुकीवरील खर्च कमी होणार आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाले, तर सरकारी निधीवरील निवडणूक खर्च कमी होईल. त्यामुळे विकासकामांना अधिक निधी आणि गती मिळणार आहे. याशिवाय मतदान केंद्रांवर वारंवार ईव्हीएमची व्यवस्था, सुरक्षा आणि निवडणुकीसाठी कर्मचारी तैनात करण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत सर्वसामान्यांचा सहभाग वाढण्यासही मदत होईल. याशिवाय एकदा निवडणुका घेतल्यास मतांची टक्केवारी वाढेल. त्याचवेळी निवडणूक आयोगाकडून वारंवार लागू होत असलेल्या आदर्श आचारसंहितेमुळे विकासाची गाडी थांबणार नाही. एकदा निवडणूक झाली, की विकासकामांवर परिणाम होणार नाही. ङ्गवन नेशन वन इलेक्शनफ देशाची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया बदलून टाकेल. सरकारने एकाचवेळी निवडणुका घेण्याच्या निर्णयावर विचार करण्याची ही पहिलीच वेळ नाही. सर्वप्रथम १९८३ मध्ये निवडणूक आयोगाने सरकारला हे सुचवले होते. त्या वर्षी प्रकाशित झालेल्या भारतीय निवडणूक आयोगाच्या पहिल्या वार्षिक अहवालात ही कल्पना उदयास आली. त्यानंतर १९९९ मध्ये कायदा आयोगाकडून ही कल्पना आली. कायदा आयोगाने निवडणूक सुधारणांच्या अहवालात एकाचवेळी निवडणुका घेण्याची शिफारस केली होती. २०१५ मध्ये कार्मिक, सार्वजनिक तक्रारी, कायदा आणि न्याय यावरील संसदीय स्थायी समितीने, २०१७ मध्ये नीती आयोग आणि २०१८ मध्ये न्यायमूर्ती बी. एस. चौहान यांच्या अध्यक्षतेखालील कायदा आयोगाने निवडणुकांबाबतचा त्यांचा मसुदा अहवाल एकाच वेळी जारी केला होता. राष्ट्रपतींना सादर केलेल्या अहवालात समितीने काय सुधारणा करणार हेही सांगितले आहे. अहवालानुसार, या बदलाचा उद्देश केवळ लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या कार्यकाळात बदल करणे हा आहे. सभागृहाचा कार्यकाळ पाच वर्षांपेक्षा जास्त वाढवू नये हा या दुरुस्तीचा उद्देश असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. कलम ८३, कलम ८५, कलम १७२ आणि कलम १७४ मधील सुधारणांचा उद्देश हा आहे, की लोकसभा किंवा विधानसभा विसर्जित करून मध्यावधी निवडणुका घेतल्यास, दुसरे निवडून आलेले सरकार समान कालावधीसाठी काम करेल. एखादे सरकार अडीच वर्षांनी बरखास्त झाले तर त्यानंतर येणारे सरकार अडीच वर्षेच काम करेल. कलम ३२७ मध्ये सुधारणा करून, सीमांकनानंतर ङ्गएकाच वेळी निवडणूकफ हे शब्द जोडले जातील. या समितीने मतदार छायाचित्र ओळखपत्र म्हणजेच ङ्गईपीआयसीफ जारी करण्याची शिफारस केली आहे. सर्व निवडणुकांसाठी एकच मतदार यादी काम करेल. याशिवाय मतदारासाठी एक ओळखपत्र बनवण्यात येणार असून, त्या आधारे तो देशातील सर्व निवडणुकांमध्ये एकाच वेळी मतदान करू शकणार आहे. देशात किंवा एकाच राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी मतदार यादीत नावे असण्याच्या समस्येपासूनही सुटका होईल. निवडणूक आयोगाला ईव्हीएम, व्हीव्हीपीएटी, मतदान कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, निवडणूक सामग्रीची आवश्यकता असेल. याशिवाय, यासाठी केंद्रीय आणि राज्य निवडणूक समित्यांमध्ये समन्वय साधावा लागेल आणि एकत्रित आराखडा तयार करावा लागेल. राज्यघटनेत ज्या दुरुस्त्या कराव्या लागतील, त्या अलोकतांत्रिक ठरणार नाहीत, असे घटनातज्ज्ञांचे म्हणणे आहे. यामुळे राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचे उल्लंघन होणार नाही. एकाचवेळी निवडणूक घेण्यास विरोध करणाऱ्या पक्षांना असे वाटते, की राष्ट्रीय पक्षांनाच सर्व निवडणुकीत यश मिळेल आणि प्रादेशिक पक्ष संपतील. खरेतर हा भारतीय मतदारांवरचा अविश्वास आहे. त्याचे कारण एकाचवेळी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका झाल्या, तेव्हाही जनतेने देशात एक आणि राज्यात दुसराच पक्ष निवडून दिला होता. भारतीय मतदारांना राष्ट्रीय आणि प्रादेशिक मुद्द्यांमध्ये फरक करण्याची पुरेशी विवेकबुद्धी आहे. त्यामुळे प्रादेशिक पक्षांनीही घाबरून जाण्याचे कारण नाही.

# जनतेच्या प्रश्नांची जाण असलेला जागृत नेता



पृथ्वीराज बाबा म्हणजे जनतेच्या प्रश्नांची जाण असलेला जागृत नेता जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात भयानक अश्या कोरोना व्हायरसने चीनमध्ये थैमान घातले असल्याच्या बातम्या रोज दुरचित्रवाहिनीवर पाहायला मिळत होत्या. याचदरम्यान फेब्रुवारीच्या १० तारखेला माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांना सातारा येथील एका पत्रकाराचा फोन आला कि, साहेब आपल्या सातारा मधील अश्विनी पाटील हि महिला चीनमधील कोरोनाग्रस्थ शहरात अडकलेली आहे तिने तिथल्या सद्य परिस्थितीचा एक व्हिडीओ सोशल मिडिया वर पाठविला आहे तो मी तुम्हाला पाठवितो, तुम्ही कृपया आपल्या जिल्ह्यातील या मुलीला परत भारतात आणावे हीच अपेक्षा आहे. त्यानुसार पृथ्वीराज बाबांनी त्या पत्रकाराने पाठविलेला व्हिडीओ पाहिला व पुन्हा त्या सातारच्या पत्रकाराला फोन केला व अश्विनी पाटील यांच्या घरातील लोकांचा मोबाईल नंबर घेतला आणि त्यानुसार अधिक माहितीसाठी अश्विनी पाटील यांच्या आई वडिलांशी पृथ्वीराज बाबांनी संपर्क साधला व अश्विनी पाटील यांची थोडी माहिती जाणून घेतली कि जेणेकरून चीनमधील भारतीय अधिकाऱ्यांशी बोलताना अश्विनी यांची किमान माहिती माहित असावी. अश्विनी यांच्या आई वडिलांचा धीर खचत चालला होता कि, कशी त्यांची मुलगी पुन्हा आपल्या देशात येईल. अश्विनीचा पोलंड येथील युवकाशी विवाह झाला होता, चीनमधील वूहान येथे ते दाम्पत्य कामानिमित्त राहत होते. अश्विनी पाटील या गृहिणी होत्या. त्यांच्या पतीला जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात काही वैद्यकीय उपचारासाठी पोलंड ला जाणे गरजेचे असल्याने ते तिथे गेले व त्यांच्यानंतर अश्विनी सुद्धा पोलंड ला जाणार होती, त्यासाठी अश्विनी यांनी चीनमधून पोलंडला जाण्यासठी व्हिसा मिळविण्याच्या उद्देशाने व्हीएफएस या खाजगी कंपनीत आपला पासपोर्ट जमा केला व एका आठवड्यात त्यांना व्हिसा मिळाल्यानंतर त्या आपल्या पतीकडे पोलंड ला जाणार होत्या. परंतु त्याचदरम्यान कोरोना व्हायरस चे प्रमाण वूहान या शहरात मोठ्या प्रमाणात वाढल्याने चीन सरकारने या शहरातील सर्व खाजगी कार्यालये बंद केली व गरज असेल तरच बाहेर पडण्याचे आवाहन नागरिकांना केले. अश्या परिस्थितीत अश्विनी पाटील या घरातच अडकून पडल्या, त्यांनी शक्य तितकी स्वतःची काळजी घेतली. यादरम्यान भारत सरकारकडून चीनमध्ये अडकलेल्या जवळपास ६०० भारतीयांना भारतात आणले गेले. या प्रक्रियेत अश्विनी यांनी सुद्धा भारतात येण्यासाठी भारतीय दूतावासाशी संपर्क साधला होता. परंतु अश्विनी पाटील यांचा पासपोर्ट जवळ नसल्याने चीन सरकारने त्यांना देश सोडण्याची परवानगी नाकारली. अश्या परिस्थितीत अश्विनी यांनी हतबल न होता आपले प्रयत्न चालूच ठेवले. त्यांनी वूहान येथील सद्य परिस्थिती सांगणारा व त्यांना परत भारतात येण्यासाठी ची मदत एका छोट्या व्हिडीओच्या माध्यमातून मांडली. या सर्व परिस्थितीबद्दल पृथ्वीराज बाबांनी अश्विनी यांच्या आई वडिलांकडून सर्व माहिती घेतली व त्यांना आधार आणि विश्वास दिला कि, तुमची मुलगी परत सातारा मध्ये येण्यासाठी सर्वोतोपरी मदत करेन. बाबांच्या या आश्वासनामुळे अश्विनीच्या आई वडिलांना एक आधार वाटला. त्यानंतर बाबांनी लगेच अश्विनी यांच्याशी व्हिडीओ कॉल च्या माध्यमातून संपर्क साधला तिच्याशी वूहान येथील सद्य परिस्थिती व त्यांच्या आरोग्याची विचारपूस बाबांनी केली व अश्विनी यांना विश्वास दिला कि, त्यांना भारतात लवकरात लवकर आणले जाईल. अश्विनी पाटील यांच्याशी बोलल्यानंतर पृथ्वीराज बाबांनी लगेच चीनमधील भारतीय दूतावासातील अधिकाऱ्यांची माहिती त्यांच्या दिल्लीमधील अधिकारी मित्रांकडून घेतली. चीनमधील भारतीय अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक मिळाले कि लगेच पृथ्वीराज बाबांनी तेथील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला व कोरोना व्हायरस किती प्रमाणात चीन मध्ये पसरला आहे हि माहिती घेतली व त्यांनी लगेच अश्विनी पाटील यांची माहिती त्या अधिकाऱ्यांना दिली तसेच बाबांनी अश्विनी यांना भारतात येण्यासाठी तत्काळ पासपोर्ट ची व्यवस्था केली जावी अशी सूचना दिली तसेच अश्विनी या घरीच असल्याने त्यांच्या खाण्या पिण्यासंदर्भात काळजी घेतली जावी असेही सांगितले. त्यानुसार तेथील अधिकाऱ्यांनी सुद्धा अश्विनी यांच्याशी तत्काळ संपर्क साधत सर्व सेवांबद्दल आश्वासित केले. त्यानंतर पृथ्वीराज बाबा हे रोज चीन च्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात होते तसेच अश्विनी पाटील यांच्या सुद्धा, रोजची माहिती भारतीय दूतावासाकडून बाबा घेत होते. अधिकाऱ्यांच्या सोबत बोलताना बाबांनी अश्विनी पाटील यांच्या सारखेच असे किती भारतीय अडकले आहेत याची माहिती अधिकाऱ्यांना विचारली त्यानुसार अधिकाऱ्यांनी २ ते ३ तास वेळ घेऊन सर्व माहिती पृथ्वीराज बाबांना फोन करून दिली. त्यावरून बाबांना असे समजले कि, चीनमध्ये जवळपास ८० ते ९० भारतीय असे आहेत कि, ज्यांना परत भारतात येण्याची इच्छा आहे आणि त्यामध्ये ८ लोक महाराष्ट्रातील आहेत.

महाराष्ट्रातील ८ लोक चीनमध्ये कोरोना संकटात अडकले आहेत हे समजताच बाबांनी आणखी काळजीने त्या अधिकाऱ्यांकडून त्या ८ जणांची संपर्क क्रमांक सहित माहिती घेतली. न राहवून बाबांनी लगेच त्या ८ जणांना स्वतःच्या मोबाईल वरून फोन केले व त्यांची विचारपूस केली, तसेच महाराष्ट्रातील त्यांचे नातलगांचे फोन नंबर घेतले व त्यांनाही स्वतः फोन करून आधार दिला कि माझे व सरकारचे तुमच्या मुलांना परत भारतात आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आता बाबांची हि लढाई फक्त सातारच्या अश्विनी पाटील यांच्यासाठीच नसून महाराष्ट्रातील ८ तसेच ९० भारतीयांसाठी सुरु झाली होती. मी स्वतः बघत होतो बाबांची रोज एकच काळजी लागून राहिली होती कि, भयानक कोरोना व्हायरस बाधित प्रदेशातून कसे आपले लोक परत भारतात येतील. चीनमधील त्या ८ जणांचा पृथ्वीराज बाबांशी रोज संपर्क होत होता तसेच चीनमधील अधिकाऱ्यांशी सुद्धा.

यादरम्यान बाबा रोज आपल्या लोकांसाठी प्रयत्न करत होते, त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना या परिस्थिती बद्दल माहिती दिली तसेच देशाचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनासुद्धा पत्र पाठवून फोनवरून संवाद साधला. त्यानंतर भारत सरकारकडून २० फेब्रुवारी तारीख निश्चित करण्यात आली कि, चीनमधील भारतीयांना परत भारतात आणण्यासाठी. तशी ती माहिती बाबांना सुद्धा अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. पण लगेच दुसऱ्या दिवशी सर्वांचाच हिरमोड झाला कारण भारत सरकारकडून भारतीय वायुदलाचे सी-१७ ग्लोबमास्टर हे विमान पाठवण्यात येणार होते परंतु चीन सरकारने ते विमान चीनमध्ये उतरविण्यास साफ नकार दिला.

आता चीन सरकारकडून परवानग्या मिळविण्याचे आपल्या भारत सरकारकडून प्रयत्न सुरु झाले, पुढच्या आठ दिवसात भारतीय विमान चीनच्या हद्दीत उतरविण्याला चीन सरकारकडून परवानगी मिळाली व भारतीय दुतावासाकडून सर्व भारतीयांना तयारीत राहण्याचे निर्देश दिले. जसा भारतीय दूतावासाकडून त्या ८ जणांनाहि फोन आले तसे त्यांनी लगेच पृथ्वीराज बाबांना संपर्क साधत याची माहिती दिली.

ते सर्वजण भारतात आल्यानंतर त्या ८ जणांचे बाबांना आभाराचे फोन तर आलेच पण त्या ८ जणांच्या आई वडिलांचे सुद्धा बाबांना आभाराचे फोन आले, त्या मुलांचे आई वडील बाबांशी बोलताना अतिशय भावूक झाले होते. अश्यावेळी बाबांना सुद्धा आनंद झाला होता पण आपल्या भावना थांबवत बाबांनी त्या मुलांच्या आई वडिलांना धीर देत सांगितले कि, थोडे दिवस तुमच्या मुलांना तपासणीसाठी ठेवले जाईल व त्यांना नंतर ते घरी येऊ शकतील.

चीनमध्ये अतिशय हतबल परिस्थितीत असणारे भारतीय कधी आपल्याला मदत मिळेल या अपेक्षेने होते त्यांना सातारच्या अश्विनी पाटील यांच्या एक व्हीडीओ मुळे ती माहिती पृथ्वीराज बाबांना मिळाली व त्यानंतर बाबांच्या प्रयत्नामुळे सरकारी यंत्रणेला गती मिळून चीनमधील अडकलेले भारतीय सुखरूपपणे भारतात आले. अश्या संवेदनशील नेत्यासोबत मी गेली ४० वर्षे काम करीत असताना असे अनेक प्रसंग पाहायला मिळाले, पृथ्वीराज बाबा हे उच्चशिक्षित जसे आहेत तसेच जनतेच्या प्रश्नांची जाण असणारे सुद्धा आहेत. अश्या हिमालया एवढे कर्तुत्व असणाऱ्या नेत्याचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या बद्दल अनेक प्रसंग स्मरणात असताना सुद्धा चीनमधील अडकलेल्या भारतीयांचा हा प्रसंग अतिशय भावणारा वाटल्याने लिखित स्वरुपात मांडण्याचा प्रयत्न केला.

अजितराव पाटील चिखलीकर
प्रदेश प्रतिनिधी व कार्यकारी सदस्य,
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

स्व.डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील यांच्या स्मृतिदिनी

## शिरोळात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**शिरोळ** : प्रतिनिधी : शिरोळ तालुक्याचे माजी आमदार व श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन स्व.डॉ.आमदार आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील यांच्या ९ व्या पुण्यतिथी निमित्त कोल्हापूर जिल्हा थलेटिक्स असोसिएशन यांच्या मान्यतेने डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील सोशल फौडेंशन यांच्यावतीने सोमवार दिनांक १ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ७ वाजता पुरुष गटातील मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे

स्व डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त चौथी मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे बक्षीस माजी सरपंच गजानन बाबुराव संकपाळ यांच्याकडून ७००१ रुपये रोख रक्कम द्वितीय क्रमांकाचे बक्षीस स्वप्नील अनिल पाटील यांच्याकडून ५००१ रुपये रोख रक्कम तृतीय क्रमांकाचे बक्षीस रमेश शिवाजीराव आरगे यांच्याकडून ३००१ रुपये रोख रक्कम देण्यात येणार आहे तसेच स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह व सहभागी स्पर्धकांना मेडल श्री रेणुका भक्त मंडळाचे अध्यक्ष दिलीपराव रामचंद्र माने यांच्याकडून देण्यात येणार आहे

सोमवार दिनांक १ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ७ वाजता शिरोळ येथील छत्रपती शिवाजी चौक ते जिरगे पेट्रोल पंप परत छत्रपती शिवाजी चौक पर्यंत मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना गळ्यातील मेडल व टी-शर्ट देण्यात येणार स्पर्धेतील स्पर्धकांना १०० रुपये प्रवेश फी देऊन नाव नोंदणी करावयाची आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# माझ्या विचाराचा खासदार द्या, पुरंदरचा बारामतीसारखा विकास करुन दाखवतो : अजित पवार

**सासवड :** आज माझ्या विचाराचा खासदार निवडून द्या,बारामती एवढं नाही पण बारामती सारखा विकास पुरंदर चा करून दाखवतो पुरंदर उपसा सिंचन योजना व्यवस्थित चालली तर सोमेश्वर कारखाना चागलां चालेल निवडणकी आल्या की विज द्यायचे पण आता कायमस्वरूपी योजना सोलर पंप शेतकऱ्याना दिली जाणार आहेत काही भागात बिबट्या फिरत आहेत म्हणून दिवसा पंप सुरू राहवे यासाठी प्रयत्न सुरू आहेत यंदा बजेट मधे विजेवर तिन्ही बाबत लाईट बिल दुखणं रद्द करणार असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले

सासवड (ता पुरंदर) येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखीतळ मैदानावर शुक्रवार (दि.१५)



पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या वतीने भव्य जाहीर सभा आणि पक्ष प्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी अजित पवार बोलत होते यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गरटकर, प्रदेश उपाध्यक्ष सुरेश घुले, पजिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, तालुक्याध्यक्ष उत्तम धुमाळ, पुरंदर हवेली विधानसभा अध्यक्ष वामन जगताप, गणेश ढोरे, युवराज बेलदरे, प्रशांत भाडळे, विराज काकडे, अमित झेंडे, शरद जगताप, दत्ता झुरंगे, बाळासाहेब कामथे, मंगेश घोणे, संदेश पवार, वंदना जगताप, प्राची शितोळे देशमुख, प्रज्योत हरपळे यांच्या सह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, अनेक लोक येतात जातात, राज्यात बघितल, धरण सुरू करणार, नारळ फोडले जातात पण काही होत नाही, नगर मधे निळवंडे धरण मी सुरू केलं

नेतृत्वात धमक असली पाहिजे काम करून घेण्याची हिमत असली पाहिजे, अधिकारी काम होत असल की काम करून देतो माझ्या विचाराचा खासदार निवडून दिला येणाऱ्या बजेटमध्ये गुंजवणी धरणाचे पाणी आणण्यासाठी निधी मंजूर करणार ,एक तर मी शब्द फार जपून देतो, दिला तर पूर्ण करतो

यावेळी गणेश जगताप, शिवाजी साळुंखे, ईश्वर बागमार, नाना सस्ते, धोंडीबा कटके, नवनाथ बोरावके, उमेश जगताप, संदीप चिकणे, संतोष कोलते, कांचनदादा निगडे, राहुल गायकवाड, गणेश मोरे, सागर धुमाळ, आदी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन पुरंदर हवेली राष्ट्रवादी काँग्रेस यांनी केले यावेळी प्रस्ताविक उत्तम धुमाळ यांनी केले मनोगत वामन जगताप यांनी केले सुत्रसंचालन संतोष नरुटे यांनी केले तर आभार अमित झेंडे यांनी मानले.

**माझ्या विचाराचा खासदार निवडून द्या, बारामती एवढं नाही पण बारामती सारखा विकास पुरंदर चा करून दाखवतो दादा गुंजवणे पाणी द्या, हौसे नवशे गवसे असतात, निर्व्यसनी रहा पाणी देतो भावनिक होतील, विरोधी पक्ष कोणी काय करायचं ज्याच्या त्याने ठरवायचं भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी यांनी एकत्रित येवून सगळ्यांनी काम करा, या पक्षाच्या सगळ्या नेत्यांनी एकत्रित येऊन काम करा तुम्ही सर्वांनी साथ द्या**

**अजित पवार : उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य**



**दत्तवाडी येथे राजश्री शाहू नागरी पतसंस्थेच्या नूतन वास्तूचा उद्घाटन करताना राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयते.**

# राजर्षी नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेच्या नूतन वास्तूचा उद्घाटन सोहळा

**कुरुंदवाड :** ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीसाठी आणि सामान्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती करण्यासाठी पत संस्थेसारखे माध्यम नाही पतसंस्था सामान्यांच्या सुखदुःखाशी समरस असतात ग्राहक आणि ठेवीदारांना दिलासा देण्याचे काम शाहू महाराजांच्या विचारांनी चाललेल्या शाहू पतसंस्थेने अविरत सुरू ठेवले आहे ही बाब सामान्य नाही त्यामुळे शाहू पतसंस्थेवर सभासदांचा आणि ठेवीदारांचा गाढा विश्वास असल्याचे येथे जाणवते असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा काका कोयते यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

दतवाड ता शिरोळ येथे राजर्षी नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेच्या नूतन वास्तूचा उद्घाटन सोहळा प्रसंगी कोयते बोलत होते ते पुढे म्हणाले या पतसंस्थेचे काम अतिशय चांगले आहे सामाजिक बांधिलकी पत्करून सेवाभावी वृत्तीने सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवून सामाजिक ऋण फेडण्याचा या संस्थेने प्रयत्न चालू केला आहे आर्थिक प्रगती मजबूत केली आहे त्यामुळे काहींना वाटते या पतसंस्थेचे बँकेत रुपांतर व्हावे माझा अनुभव पाहता बँकेत रुपांतर करणे म्हणजे हा पतसंस्थेला शाप आहे बँकेचे निकष ग्राहकांना न परवडणारे आहेत.

# बाणेर येथिल पाडलेले अतिक्रमण परत लागले



**बाणेर,बालेवाडी ::** बाणेर येथिल अतिक्रमण विभागाने पाडलेले अतिक्रमणाची दूकाने परत पत्राचे शेड उभारून दूकाने सूरू केली जात आहेपरत परत दूकाने पाडण्याचा प्रकार यावर कायम स्वरूपी तोडगा काढण्याची येथिल जनतेची मागणी

बाणेर येथिल पॅन कार्ड क्लब रोड,धनकुडे वस्ती, कळमकर चौक, कोविड हॉस्पिटल जवळील ठिकाणी पूष्कळ लोकांनी अतिक्रमण करून दूकाने ठाटली होती हे अतिक्रमण अतिक्रमणविभागाने तीन वेळेस पाडली तरी परत दूकाने टाकण्याचा प्रकार घडत आहे प्रत्येक वेळेस अतिक्रमण पाडायचे याचा खर्च फार येत असतांनाही महानगरपालिका या अतिक्रमण करणारे व्यक्तिवर कायम स्वरूपी तोडगा काढत नाही अतिक्रमण पाडण्यावर होणारा खर्च हा जनतेच्या खिश्यातूनच होतो परत अतिक्रमण करणारे व्यक्तिवर गून्हे दाखल करण्याची मागणी येथिल जनतेची होत आहे अतिक्रमण करून दूकाने परत थाटणारे यांना कोणाचा आर्शिवाद मिळतो हा एक संशोधनाचा विषय आहे अशा लोकांना कोणाचाही धाक राहला नसून आम्ही कायदा मोडीत काढतो तूम्ही कारवाई करत राहा असा प्रकार येथे सुरू आहेएकदा पाडलेले अतिक्रमण परत होत असेल तर यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे नाही तर जोतो ऊठेल आणि कोठेही अतिक्रमण करून आपले दूकानदारी सूरू करत राहतील या विभागात पाडलेले अतिक्रमणातिल एकाही दूकानदारांनी भाडे करार किंवा जागा मालकांनी दूकाने भाड्याने देतांना शासनच्या नियमानूसार भाडे करार केलेला नाही खाली जागा मालक जो तो ऊठतो आणि भाड्याने दूकाने देतो मग दुकाने भाड्याने घेणारे कशी आणि कोणत्या प्रकारचे आहे याची पाहण्याची गरज यांना पडत नाही या मूळे गून्हेगारी

प्रवृत्ती या विभागात वाढत आहे काही किराणा दूकानात देशी विदेशी दारू अमली पदार्थ राजेरोसपणे विकत आहे तर काही ठिकाणी घरगूती पाच लिटर, मोठे सिलेन्डर किराणा दूकानात विकण्याचा प्रकार या विभागात सूरू आहे.

# उद्धव ठाकरे - राजू शेट्टी यांची मातोश्रीवर भेट

**कोल्हापूर :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी शनिवारी पुन्हा एकदा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी झालेली चर्चा सकारात्मक झाल्याचा दावा स्वाभिमानी कडून केला जात आहे.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघात राजू शेट्टी यांनी महाविकास आघाडी कडून निवडणूक लढवावी असे अशी साद घालण्यात आली आहे. त्यास राजू शेट्टी यांचा नकार आहे. शेट्टी हे स्वतंत्रपणे लढणार आहेत महाविकास आघाडीने त्यांना पाठिंबा द्यावा, अशी त्यांची भूमिका आहे. यामुळे संभ्रम निर्माण झाला आहे.

# पन्हाळगडाचे ऐतिहासिक महत्त्व जपण्यावर भर देणार : अमोल येडगे

**पन्हाळा :** ऐतिहासिक वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.त्यासाठी स्वच्छते बरोबरच पन्हाळगडाचे ऐतिहासिक महत्त्व सांगणाऱ्या इमारतींची जपणूक करण्यावर भर देण्यात येणार असलेचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी सांगितले.ते पन्हाळगडाचे नाव वारसा स्थळांच्या यादीत समावेशाच्या प्रस्तावासाठी गडाची व त्यावरील ऐतिहासिक इमारतींची पाहणी करण्यासाठी पन्हाळगडावर आले होते.

वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाच्या समावेशासाठी शासनामार्फत प्रस्ताव दाखल करण्यात येणार आहे. व त्या दृष्टीने पाहणी करण्यासाठी युनेस्कोची टीम येत्या ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात गडाला भेट देणार आहे.त्या अनुशंगाने



**जागतिक वारसा स्थळाच्या यादीत पन्हाळ्याच्या प्रसतावासाठी पहाणी करताना जिल्हाधिकारी अमोल येडगे, ईतिहास अभ्यासक डॉ. सचिन पाटील, मुख्याधिकारी चेतन कुमार माळी, तहसीलदार माधवी शिंदे जाधव व मान्यवर.**

जिल्हाधिकाऱ्यांनी शनिवारी पन्हाळा गडाला भेट दिली.यावेळी केलेल्या पाहणी नंतर ते म्हणाले,गडावर आजही भरपूर ऐतिहासिक इमारती सुस्थितीत आहेत. यामुळेच वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाचा समावेश होत आहे.त्यामुळे यासाठीच्या प्रस्तावात गडाचे वैभव,गडावरील अस्तित्वात असलेल्या ऐतिहासिक इमारती, गडावरील छत्रपतींचे वास्तव्याचा ठेवा,ऐतिहासिक व पौराणिक महत्व विषद केले जाणार आहे.त्यासाठी भारतीय पुरातत्वाविभागाने गडाला पूर्वीचे वैभव देण्याची योजना आखली आहे.त्या प्रमाणे ती सर्व कामे वेगवेगळ्या टप्प्यात केली जाणार आहेत.त्यासाठी गडावर भविष्यातील या संमंधित करण्यात येणाऱ्या सर्व योजना व बदल करत असताना स्थानिक लोकांना सहभागी करून घेतले जाईल.तसेच ऐतिहासिक दृष्टीने हानिकारक ठरणारी गडावरील अनधिकृत अतिक्रमणे प्राधान्याने हटवली जातील असे सांगितले.

**पन्हाळ्यातील स्थानिक रहिवाशांच्या सहभागातूनच नवीन सुधारणा होणार आहेत त्यामुळेपन्हाळगड वारसा स्थळांच्या यादीत जाण्यामुळे स्थानिकांनी कोणताही गैर समाज करून घेऊ नये.अथवा अफवांवर विश्वास ठेऊ नये.**

**- अमोल येडगे, जिल्हाधिकारी कोल्हापूर**

यावेळी पन्हाळा तहसीलदार माधवी शिंदे-जाधव, नगरपालिकेचे मुख्याधिकारी चेतन माळी,सार्वजनीक बांधकामाचे अभियंता अमोल कोळी, पुरातत्त्वचे मोनो प्रजापती,अश्पाक गारदी आदींसह संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व पन्हाळा नागरिक उपस्थित होते.भारतातील जेसलमेर किल्ल्यावर लोक रहिवास आहे.

त्याच समावेश जागतिक वारसा स्थळांच्या यादीत आहे. तेथे आज हि शहर वसलेले आहे त्याच धर्तीवर पन्हाळगडावर सुध्दा लोक रहिवास असल्याने पन्हाळ्याचा समावेश जरी जागतिक वारसा स्थळाच्या यादीत समावेश झाला तरीही तेथील लोकांना घाबरण्याचे कारण नाही पन्हाळ्यातील रहिवास अबाधित राहणार आहे.

# एलपीजे इनोव्हेशन ऍवॉर्डस् ही विकसित भारतासाठी नवसंकल्पनांना चालना देणारी स्पर्धा : शंकर जगताप

**पिंपरी :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला २०४७ मध्ये विकसित भारत करण्याची संकल्पना मांडली आहे. ते प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेक कल्पक आणि नाविन्यपूर्ण संकल्पना पुढे येण्याची गरज आहे. त्यासाठीच एलपीजे इनोव्हेशन ऍवॉर्डस् ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडमधील विद्यार्थ्यांमध्ये दडलेली कल्पकता आणि नवकल्पना पुढे यावी. याच विद्यार्थ्यांमधून पुढे देशाचे मोठे शास्त्रज्ञ, उद्योजक घडावेत हा उद्देश समोर ठेवून ही स्पर्धा घेण्यात आली. यापुढे दरवर्षी ही स्पर्धा भरवून विद्यार्थ्यांमधील नवकल्पनांना वाव देणार असल्याचे भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी शनिवारी (दि. १६) सांगितले.

शंकर जगताप यांच्या संकल्पनेतून लक्ष्मणभाऊ जगताप कला आणि क्रीडा अकादमीच्या वतीने शहरातील शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या एलपीजे इनोव्हेशन ऍवॉर्डस २०२४ या स्पर्धे



च्या बक्षिस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. नवी सांगवीतील न्यू मिलेनियम इंग्लिश स्कूल येथे हा कार्यक्रम झाला. यावेळी स्पर्धेचे परीक्षक डॉ. सतीश मिश्रा, प्रा. डॉ. मुकेश अग्रवाल, प्रा. डॉ. मंजिरी शर्मा, प्रा. शरद गुप्ता, मुख्याध्यापिका स्वाती पवार, इनायत मुजावर, भाजपचे शहर सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडिगेरी, माजी नगरसेवक सागर आंगोळकर, लक्ष्मणभाऊ जगताप कला आणि क्रीडा अकादमीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली जगताप, गणेश सहकारी बँकेचे संचालक प्रमोद ठाकर, राज सोमवंशी, सागर फुगे, प्रा. प्रल्हाद झरांडे, प्रताप बामणे, डॉ. विकास पवार आदी उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी विज्ञान, पर्यावरण, डिजिटलायझेशन, शाश्वत स्मार्ट सिटी, रेव्हेन्यू, हेल्थ एंड वेलनेस, कल्चर एंड हेरिटेज, वेस्ट मॅनेजमेंट, अर्बन मोबिलाइझेशन, ई-गव्हर्नन्स आदी विषयांवर शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सर्जनशील, कल्पक आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करण्याचे किंवा कल्पना सुचविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यासाठी अकादमीने शहरातील प्रत्येक शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती निर्माण केली होती.

५ डिसेंबर २०२३ ते १५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आयोजित या स्पर्धेत शहरातील एकूण ३९ शाळा, कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील तब्बल ६१२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत पहिल्यांदाच आयोजित केलेल्या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यातील ४९४ विद्यार्थी या स्पर्धेत पात्र ठरले. या विद्यार्थ्यांनी अनेक नाविन्यपूर्ण कल्पनांचे प्रकल्प सादर केले. दिपू सुरेशकुमार मोरे, यस्वी गुलशन मल्होत्रा, शुभ शशिकांत म्हात्रे, शुभम सिद्धनाथ जानकर, संतोषी हरियत राजपुरोहित, प्रांजल कृष्णा वागळे, प्रज्वल बी. आर., प्रत्यय शरण स्वामी, आर्यन गोगले, प्रियदर्शनी उत्तम वायसे, पांडुरंग विलास जेतकर, मृदुला संदीप खेडकर, ऋषीकेश शरद मेमाणे, सानिका संतोष सप्रे आणि सोहम शिवाजी गोगरे यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना लॅपटॉप व चषक, द्वितीय आणि तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना टॅबलेट व चषक तसेच परीक्षकांनी निवडलेल्या विजेत्यांना स्मार्ट वॉच व तषक देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे द गाईडींग लाईट हे पुस्तक देऊन प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले, भारत एक नाविन्यपूर्ण अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला विकसित राष्ट्र करण्याची गॅरंटी दिली आहे. ही गॅरंटी पूर्ण करण्यासाठी नवीन शोध, नवीन संकल्पना आणि नवनवीन तंत्रज्ञान पुढे येणे गरजेचे आहे. त्यासाठी पुढील पिढीला विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये स्वारस्य निर्माण करण्यासाठी तसेच त्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्यासाठी एलपीजे इनोव्हेशन ऍवॉर्डस २०२४ ही स्पार्धा आयोजित करण्यात आली होती.

# आम्ही बारणेसाठी दोन वेळा झटलो..पण आता आम्हाला बारणे उमेदवार नकोत

## मावळातील भाजप कार्यकर्त्यांची भुमिका

वडगाव मावळ : मावळ लोकसभेच्या उमेदवारीसाठी खासदार श्रीरंग बारणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या भेटीला मुंबईत दाखल होताच मावळातील भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.

आम्ही दोनवेळा बारणेंसाठी झटलो, पण आता आम्हाला बारणे उमेदवार नकोत असे म्हणत त्यांच्या उमेदवारीला त्यांनी विरोध केला आहे. बाळा भेगडे यांच्या निवासस्थानी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत कार्यकर्त्यांनी बारणे यांना उमेदवारी दिल्यास आम्ही मतदानच करणार नाही अशी भूमिका घेत बारणे यांच्या उमेदवारीला विरोध दर्शवला आहे.

बाळा भेगडे यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीला भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे, रवींद्र भेगडे भाजपाचे प्रभारी भास्करराव म्हाळसकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब गुड, माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर, सुधाकर ढोरे, बाळासाहेब घोटकुले रामभाऊ गोपाळे, नितिन मराठे लहु शेलार आदीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



भेगडे यांचे समर्थकांनी अत्यंत आक्रमक भाषणे करून आपल्या भावना व्यक्त केल्या. खासदारांनी दहा वर्षांत केलेल्या कामात कुठेही भाजपच्या कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी विश्वासात घेतले नाही अशी खंत सर्वांनी व्यक्त केली. मावळची उमेदवारी बदला अन्यथा आम्ही काम करणार नाही. केवळ आणि केवळ युती धर्म पाळायचा म्हणत असे चालणार असेल तर ते आम्ही चालून घेणार नाही, असा इशारा देण्यात आला.

त्वरीत निर्णय घेतला नाही तर पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडतील, असेही सांगण्यात आले. भाजपला उमेदवारी मिळाली नाही तर प्रसंगी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा देण्यात आला. कोणत्याही परिस्थितीत बारणे यांचे काम करणार नाही इशारा दिला.बाळा भेगडे उमेदवार नसतील तर एकाही उमेदवाराला मतदान करायचे नाही, असाही निर्णय यावेळी करण्यात आला.

# क्राईम

## वेण्णा नदी पुलाजवळ आढळला बेवारस मृतदेह

**सातारा :** वेण्णा नदी पुलाजवळ एक बेवारस मृतदेह आढळल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी सकाळी पावणेआठ वाजण्याच्या दरम्यान वेण्णा नदीच्या पुलाजवळ वाढे फाटा येथे एका अनोळखी पुरुष जातीचा मृतदेह आढळून आला आहे. मृतदेहाच्या अंगावर बर्मुडा व शर्ट आहे. अधिक तपास पोलीस हवालदार शिंदे करीत आहेत.

## बँक अधिकाऱ्यास धमकी दिल्या प्रकरणी एकाविरोधात तक्रार

**सातारा :** बँक अधिकाऱ्यास धमकी दिल्या प्रकरणी एका विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, संजय दत्तात्रय पवार राहणार सैदापूर सातारा यांनी जनता सहकारी बँक सातारा यांच्याकडून कर्ज घेतले असून ते परत न फेडल्याने जप्ती प्रक्रिया सुरू आहे. यावेळी संजय पवार यांनी हमीद अमरुद्दीन शेख या जनता बँकेच्या व्यवस्थापकास धमकी दिली असून याबाबतची तक्रार सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार मेटकरी करीत आहेत.

## स्वत:चे अस्तित्व लपवल्या प्रकरणी तिघांवर कारवाई

**सातारा :** स्वत:चे अस्तित्व लपवल्या प्रकरणी तिघांवर सातारा शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास अमित तानाजी जाधव रा. देगाव रोड, आहेरे कॉलनी, एमआयडीसी, सातारा हे गोडोली सातारा येथे एका इमारतीच्या आडोशाला कोणत्याही कारणाशिवाय संशयितरित्या स्वत:चा चेहरा लपवून बसलेले आढळून आले.

दुसऱ्या घटनेत बॉम्बे रेस्टॉरंट चौक येथील सर्व्हिस रोड लगत असलेल्या इमारतीच्या आडोशास जोगेंद्र नंदलाल मोरया राहणार बहार, महाराजगंज, उत्तर प्रदेश हा आढळून आला.

तर तिसऱ्या घटनेत बॉम्बे रेस्टॉरंट चौक सातारा कोरेगाव जाणाऱ्या रोडच्या शेजारील इमारतीच्या आडोशास चंदन रामप्रवेश पाल रा. बगाही, कुशीनगर, उत्तर प्रदेश हा संशयास्पद आढळून आला.

## जातीवाचक शिवीगाळ प्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा :** जातीवाचक शिवीगाळ प्रकरणी दोघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक ९ रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास निसर्ग कॉलनी, वाढे फाटा, सातारा येथे दीक्षा तुषार गायकवाड यांना जातिवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी विशाल गवळी आणि त्यांची पत्नी दोघेही रा. सोमवार पेठ, सातारा यांच्या विरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी नवले करीत आहेत.

## खेड परिसरात तब्बल नऊ लाखांची घरफोडी

**सातारा :** खेड परिसरात अज्ञात चोरट्यांनी तब्बल नऊ लाखांची घरफोडी केल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १३ रोजी सकाळी साडेअकरा ते दुपारी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान जय मोरया नगर, नक्षत्र बंगलो, खेड, ता. सातारा येथील बापूराव बाबुराव सोनवलकर यांच्या राहत्या बंद घराच्या दरवाज्याची कडी अज्ञात चोरट्यांनी तोडून बेडरूम मधील लाकडी कपाटाच्या ड्रॉवरमध्ये असलेले एकूण ९ लाख २९ हजार पाचशे रुपये किमतीचे व २९ तोळे, सहा ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घरफोडी चोरी करून नेले आहेत. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करीत आहेत.

## मारहाण झाल्याने गोरेगाव निमसोड येथे एकाचा आत्महत्येचा प्रयत्न

**वडूज :** गोरेगाव (निमसोड) ता खटाव येथील आनंदराव डोईफोडे यांना गावातील तीन इसमांनी बेदम मारहाण केली. त्यामुळे भीतीपोटी आनंदराव डोईफोडे यांनी कीटकनाशक औषध प्राशन केले. त्यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर सातारा येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याबाबत जिल्हा पोलीस प्रमुखांना त्यांचे बंधू अंकुश बाबुराव डोईफोडे यांनी निवेदन दिले आहे. त्या निवेदनातील अधिक माहिती अशी, माती उचलण्याचे पैसे मागीतल्याच्या कारणावरुन चिडून जावून गावातील सुशीलकुमार दत्तू पाटील, ज्ञानेश्वर गोविंद पाटील व इतरांनी मारहाण केली.  मारहाणीची फिर्याद देण्यासाठी ते पोलीस ठाण्यात गेले. मात्र पोलिसांनी वैद्यकीय प्रमाणपत्र घेवून आल्याशिवाय फिर्याद दाखल करता येणार नाही असे सांगितले. त्यानंतर ते ग्रामीण रुग्णालयात गेले. त्या ठिकाणी पोलिसांचे पत्र असल्याशिवाय तुम्हाला प्रमाणपत्र देता येत नाही. अश्या प्रकारे दोन्हीकडून कुचंबना झाल्याने डोईफोडे यांनी विषारी औषध प्राषण करुन आपले जीवन संपविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या जीवीतास बरेवाईट झाल्यास संबंधित लोकांना, प्रशासनास जबाबदार धरावे.असं निवेदनात म्हटलं आहे.

## ॲड. प्रल्हाद सावंत यांचा रणजितसिंह देशमुखांच्या हस्ते सत्कार

**वडूज :** वडूज बार आसोसिएशन चे माजी अध्यक्ष ड.प्रल्हाद सावंत (पी.डी. सावंत) यांची भारत सरकारच्या नोटरीपदी निवड झालेबद्दल त्यांचा राष्ट्रीय काँग्रेस नेते रणजितसिंह देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी खटाव तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष डॉ. संतोष गोडसे, राहुल सजगने,प्राध्यापक ऋषीकेश इनामदार, निलेश घार्गे आदींची उपस्थिती होती.

# जिल्ह्यातील अग्रणी कारखाना म्हणून प्रतापगडची ओळख होईल

## आ. शिवेंद्रसिंहराजे; ३ लाख मे. टन गाळप करून हंगामाची यशस्वी सांगता

**सातारा :** जावली तालुक्यातील एकमेव मोठी सहकारी संस्था असलेला प्रतापगड साखर कारखाना ऊस पुरवठादार शेतकरी आणि कामगार यांच्या लाखमोलाच्या सहकार्यातून पुन्हा सुरु झाला आहे. या पहिल्याच गळीत हंगामात कारखान्याने ३ लाख १ हजार ५१ मे. टन गाळप केले आहे. अनेक अडचणींवर मात करून कारखाना पुन्हा उभा राहिला. ऊस पुरवठादार शेतकरी, सभासद आणि कामगारांनी असेच सहकार्य ठेवल्यास आज ना उद्या, दोन-पाच वर्षांनंतर प्रतापगड कारखाना हा सातारा जिल्ह्यातील उच्चतम दर देणारा कारखाना असा नावलौकिक मिळवेल, असा विश्वास अजिंक्यतारा-प्रतापगड साखर उद्योग समूहाचे मार्गदर्शक आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केला.



तीन- चार वर्ष बंद अवस्थेत असलेला प्रतापगड सहकारी साखर कारखाना अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याच्या मदतीने पुन्हा सुरु करण्यात आला. प्रतापगड कारखान्याचा पहिलाच गळीत हंगाम यशस्वीपणे संपन्न झाला. हंगामाची सांगता अंतिम ११ पोत्यांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी अधिकारी व कामगारांचा सत्कारही करण्यात आला. याप्रसंगी आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष वसंतराव मानकुमरे, प्रतापगड कारखान्याचे चेअरमन सौरभ शिंदे, व्हा. चेअरमन शिवाजीराव मर्ढेकर, अजिंक्यताराचे चेअरमन यशवंत साळुंखे, व्हा. चेअरमन नामदेव सावंत, कार्यकारी संचालक जिवाजी मोहिते, राजेंद्र भिलारे, दोन्ही कारखान्याचे सर्व संचालक, रविंद्र परामने, जावली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदीप शिंदे, सातारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अरुण कापसे, दादा पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आ. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले, अनंत अडचणी असताना ऊस पुरवठादार शेतकरी आणि कामगार-कर्मचाऱ्यांच्या अनमोल सहकार्यामुळेच प्रतापगड कारखाना पुन्हा सुरु झाला आहे. लालसिंग काकांचे स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्ण झाले आहे. जावली, वाई, खंडाळा, कोरेगाव, भोर येथील उसपुरवठादार शेतकऱ्यांनी आपला ऊस पुरवला त्यांचे आणि सर्व कामगार-कर्मचाऱ्यांचे मी आभार मानतो. आपण सर्वांनी मिळून एक टीम म्हणून काम केले आणि त्याचे फलित म्हणून जावलीतील शेतकऱ्यांचे हक्काचे सहकार मंदिर पुन्हा उभे राहिले आहे. दराच्या स्पर्धेत टिकण्यासाठी प्रतापगड कारखान्याने ३ हजार रुपये प्रतिटन दर दिला. आता हंगाम यशस्वीपणे संपन्न झाला आहे. आपल्याला अजून खूप पुढे जायचे आहे. त्यामुळे पुढील हंगामातही सर्वांनी असेच सहकार्य कायम ठेवावे. आज ना उद्या, पुढील दोन- पाच वर्षात प्रतापगड कारखाना जिल्ह्यातील सर्वात जास्त दर देणारा कारखाना अशी ओळख कारखान्याची झाल्याशिवाय राहणार नाही.

कामगारांनी केलेल्या अनमोल सहकार्याची दखल म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल प्रशासनाच्यावतीने त्यांना बक्षीसही देण्याची घोषणा आ. शिवेंद्रसिंहराजेंनी केली. संस्थेपुढे अनेक आव्हाने आहेत. बँक व तोडणी, वाहतूक यंत्रणा यांची देणी आहेत. त्यामुळे काटकसरीचे नियोजन करूनच पुढील वाटचाल करावी लागणार आहे. आगामी काळात डिस्टिलरी, इथेनॉल निर्मिती आदी प्रकल्प सुरु करून कारखान्याचे उत्पन्न वाढवण्यावर भर दिला जाईल. शेअर्स वाढवणे, टप्प्याटप्प्याने भागभांडवल वाढवणे हि कामे करावी लागणार आहेत. त्यामुळे हि संस्था पूर्ण सक्षमपणे उभी राहावी यासाठी आपण सर्वांनी कायम सहकार्य ठेवावे, असे आवाहन आ. शिवेंद्रसिंहराजेंनी केले. दरम्यान, तालुक्यातील विकासाबाबत बोलण्यापेक्षा मी कृतीतून दाखवून दिले आहे. पाचवड, मेढा ते शेंबडी या रस्त्याचे काम मार्गी लागणार आहे. मुनावळे येथे जलपर्यटन सुरु केले आहे. तालुक्यातील पर्यटन वाढीवर भर दिला असल्याचे ते म्हणाले.

सौरभ शिंदे म्हणाले, बंद पडलेला कारखाना बाबाराजेंच्या साथीमुळे पुन्हा उभा राहिला आहे. शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या सहकार्याने कारखाना सुरु झाला. अनेक अडचणी आल्या पण, बाबराजेंच्या पाठिंब्यामुळे ३ लाखापेक्षा जास्त गाळपाचे उद्दिष्ट गाठले. पुढेही याच पद्धतीने प्रतापगड जिल्ह्यातील अग्रेसर कारखाना म्हणून नावारूपाला आणू. ३- ४ वर्ष कारखाना बंद होत. आता कारखाना शून्यातून उभा राहिला. आपल्या सर्वांच्या सहकार्याने आगामी हंगामही यशस्वीपणे पार पाडू. आ. शिवेंद्रसिंहराजेंमुळे गावागावात विकासकामे झाली आहेत. त्यामुळे कोणत्याही निवडणूकीची चिंता नाही पण, बाबाराजेंच्या रूपाने तालुक्याला मंत्रिपद मिळालेच पाहिजे, असे शिंदे म्हणाले.

# पिंपोड्याच्या महिला सरपंचांनी पाण्याच्या टँकरसाठी दिले मानधन

## पंचवीस हजारांची मदत : वस्तीवरील ग्रामस्थांसाठी टँकरने पाणीपुरवठा सुरु

कोरेगाव : कोरेगाव तालुक्याचा उत्तर भाग भीषण पाणी टंचाईचा सामना करीत आहे. परिसरातील सर्वच गावांच्या पिण्याच्या पाण्याची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे. दिड वर्षांपूर्वी जनतेतून निवडून आलेल्या महिला सरपंच सौ. दिपिका सागर लेंभे यांनी पदभार स्विकारल्यापासून दुष्काळाला सुरुवात झाली. त्याची तीव्रता सध्या भीषण आहे. शेत वस्तीवर राहणाऱ्या महिला भगिनींचा पाण्यासाठी चाललेला संघर्ष पाहून मिळालेले सरपंच पदाचे मानधन त्यांनी पाणी टँकरसाठी पंचवीस हजार रुपयांची रक्कम ग्रामपंचायतीकडे सुपूर्द केले. व वस्तीवरील लोकांना टँकरने पाणीपुरवठा सुरू केला.



उत्तर कोरेगाव तालुका हा तसा कायम दुष्काळी म्हणूनच ओळखला जातो. इथली नैसर्गिक व भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. ठोस व कायमस्वरूपी पाण्याची कोणतीही योजना नसल्याने शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याची अवस्था कायम दयनीय असते. ही गेल्या कित्येक वर्षांची परिस्थिती आहे.

प्रशासनाकडून परिसरातील अनेक गावांना पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले आहेत.पिंपोडे बुद्रुक हे गाव बाजारपेठेचे व मध्यवर्ती ठिकाण आहे.सध्याची गावाची लोकसंख्या जवळपास साडे बारा हजार आहे.मात्र सन २०११ च्या जनगणनेनुसार सव्वा सहा हजार लोकसंख्या प्रशासनाकडे दिसून येते.त्यामध्ये पंधरा टक्के टँकर वाढ केली असली तरी लोकसंखेच्या तुलनेने पाण्याची गरज दुप्पट आहे. मात्र शासनाची भूमिका टंचाई निवारणाबाबत फार उदासीनता दिसत आहे.

पिंपोडे गावाला जोडून असणाऱ्या गार्डीवस्ती, लेंभेवस्ती, केंजळेवस्ती येथील नागरिकांच्या पाण्याची मोठी गैरसोय होत आहे. मात्र प्रशासनाकडून वाढीव पाणी टँकर मिळण्यासाठी खूप अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वाढीव टँकरच्या खेपा मिळवण्याचा प्रयत्न झाला मात्र अधिकाऱ्यांनी हात वर केले आहेत. वस्तीवर राहणाऱ्या नागरिकांची होत असलेली गैरसोय पाहून सरपंच दिपिका लेंभे यांनी.त्या सरपंच झाल्यापासून त्यांना मिळालेले संपूर्ण मानधन या नागरिकांच्या पाण्यासाठी देण्याचा निर्णय घेतला. त्याचा धनादेश ग्रामपंचायतीकडे सुपूर्द केला. त्यातून खाजगी टँकरद्वारे गार्डीवस्ती येथे पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. इतर वस्तीवरील नागरिकांना सुध्दा पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# करंजखोपच्या उपसरपंचपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे सूरज शिंदे

**आसनगाव :** करंजखोप (ता. कोरेगाव) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे सूरज जनार्दन शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. उपसरपंच सौ. रूपाली धुमाळ यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. त्यानंतर लोकनियुक्त सरपंच सौ. राधिका धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली सर्व सदस्यांची ग्रामपंचायत कार्यालयात सभा झाली. यावेळी सौ. रूपाली धुमाळ, संभाजी धुमाळ, हणमंत धुमाळ, सिराज शेख, सौ. सारिका कर्णे, प्रमिला भोसले, अलका नेवसे, शुभांगी वैराट हे सदस्य उपस्थित होते. यावेळी सूरज शिंदे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात झाले. सूरज शिंदे हे सर्वात तरुण सदस्य असून सर्वाधिक मतांनी ते विजयी झाले होते. पंचायत समितीच्या कृषी अधिकारी हेमांगी शेडगे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांना ग्रामसेवक विठ्ठल सोनवलकर यांनी सहकार्य केले. या निवडीबद्दल विधान परिषदेचे माजी सभापती आ. रामराजे नाईक निंबाळकर, आ. मकरंद पाटील, आ. दीपक चव्हाण, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील, ऊत्तर कोरेगावमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी सूरज शिंदे यांचे अभिनंदन केले.



## जावली तालुक्यातील ११ रस्त्यांच्या सुधारणेसाठी २५ कोटी मंजूर

**सातारा :** सातारा- जावली विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी निधीचा अक्षरशः वर्षाव करणाऱ्या आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यातून जावली तालुक्यातील ११ रस्त्यांची सुधारणा, पूल आणि पोहोच रस्ते करण्यासाठी तब्बल २५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

# बॅनरबाजीशी धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीचा संबंध नाही : सी. आर. बर्गे

**कोरेगाव :** धोम धरण लाभ क्षेत्रातील लोकप्रतिनिधींना नम्र निवेदन आहे की,मोठ्या प्रशासकीय इमारती, चकचकीत सिमेंटचे रस्ते ही विकासाची मानके असली तरी,पाणी सिंचन व्यवस्था मजबूत आणि शाश्वत होण्यासाठी त्याच्या दुरुस्तीसाठी पुरेसा निधी मिळणे आवश्यक आहे. तसेच सुनियोजन करून मूळ प्रकल्पानुसार सर्व लाभ क्षेत्रातील शेतीला वेळेत, प्रवाही पद्धतीने सिंचनासाठी पुरेसे पाणी मिळेल याची प्राधान्य क्रमाने लाभ क्षेत्रातील व्यवस्था केली तरचं शेती समृद्ध होऊन खऱ्या अर्थाने शेतकरी विकासाचा लाभ घेऊ शकणार असल्याचे प्रतिपादन धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष सी. आर. बर्गे यांनी केले.



गेल्या दोन दिवसापुर्वी कोरेगाव तालुक्यात विविध ठिकाणी पाण्याच्या मसंदर्भात फलक लावणेत आले आहेत. सदर फलक धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीने लावले आहेत काय? याबाबत काही शेतकऱ्यांनी चौकशी केली. सदर फलकावरील मजकूर राजकीय वाटल्याने समिती अशी राजकीय भूमिका घेते आहे का? अशी शंकाही उपस्थित करण्यात आली. हया फलकांशी धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीचा संबंध नाही. ज्या कोणीही फलक तयार केले, त्याला त्याचं वेळी बॅनरवरील समितीच्या नावाला हरकत घेवून, समितीचे बॅनरवरील नाव काढून टाकण्यास सांगण्यात आले होते व ते नाव फलकावरून हटविण्यात आले आहे. ज्या कोणी हा दिशाभूल करण्याचा प्रकार, केला आहे.

त्याला संघर्ष समितीच्या वतीने निषेध करण्यात आला आहे.

धोम धरण पाणी बचाव संघर्ष समिती धोम धरण लाभ क्षेत्रातील शेतीला सिंचनासाठी प्रकल्प तरतुदीनुसार पुरेशी वेळेवर पाणी उपलब्ध होण्यासाठी कार्य करणारी राजकारण विरहित सर्व लाभक्षेत्रातील वाई, सातारा, जावली, कोरेगाव या चार तालुक्यातील शेतकऱ्यांची बनलेली संघटना आहे. या संघर्ष समितीच्या माध्यमातून सिंचन व्यवस्थेमधील त्रुटी, गैरव्यवस्थापन, पाण्याचा होणारा नियमबाह्य विनियोग,

# पर्यटनवाढीच्या दृष्टीने महत्वाचा पाचवड ते मेढा ते शेंबडी रस्ता लागणार मार्गी

## आ. शिवेंद्रसिंहराजेंचा पाठपुरावा; महॅमम योजनेतून मिळवला ४५१.६० कोटी निधी

सातारा : सातारा- जावली मतदारसंघात पर्यटनवाढीसह रोजगारनिर्मितीला प्राधान्य देऊन विविध महत्वकांक्षी प्रकल्प राबवणाऱ्या आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यातून पाचवड ते मेढा आणि मेढा ते शेंबडी या रस्त्याच्या सुधारणेसाठी तब्बल ४५१.६० कोटी रुपये निधी उपलब्ध झाला आहे. यामुळे सातारा आणि जावली तालुक्यातील पर्यटनाला खूप मोठी चालना मिळणार असून जनतेचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होणार आहे. राज्य शासनाच्या हॅम योजनेतून हा निधी मंजूर झाला असून याबद्दल आ. शिवेंद्रसिंहराजेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ना. अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीनुसार आणि पाठपुराव्यातून राष्ट्रीय महामार्ग ४ ते पाचवड, कुडाळ, मेढा, कोळघर, अंधारी, फळणी, मुनावळे, वाघळी, शेंबडी या रस्त्याची सुधारणा करणे (भाग पाचवड ते मेढा आणि भाग मेढा ते शेंबडी) या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी (लांबी ५६.४५ कि.मी.) ४५१.६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या कामाची निविदा प्रक्रिया नुकतीच पार पडली असून लवकरच या रस्त्याच्या कामाला प्रारंभ होणार आहे. जसे सातारा ते कास पठार या रस्त्याचे दर्जेदार काम करण्यात आले आहे त्याच पद्धतीने याही रस्त्याचे काम होणार आहे. त्यामुळे या रस्त्याच्या आजूबाजूच्या जनतेचे आणि पर्यटकांचे दळणवळण सुकर होणार आहे तसेच वेळेची आणि इंधनाची बचत होणार आहे. हाच रस्ता पुढे शेंबडी पासून कोकणाला जोडला जाणार असल्याने कास, बामणोली, मुनावळे, वासोटा, महाबळेश्वर, पाचगणी येथील पर्यटन वाढणार आहे त्याशिवाय या प्रस्तावित मार्गाने पर्यटकांना थेट कोकणात कमी वेळेत आणि कमी खर्चात जाता येणार आहे. त्यामुळे सातारा आणि जावली तालुक्यातील पर्यटनवाढीला मोठी चालना मिळणार आहे.

पाचवड ते मेढा कि.मी. ४०/५५० ते ५९/९५० आणि मेढा ते शेंबडी कि.मी. ०/०० ते ३७/१०० या रस्त्याची सुधारणा करण्याचे काम आता मार्गी लागणार आहे. त्यामुळे या भागातील पर्यटन वाढीच्या दृष्टीने महत्वाचा अडसर दूर होणार आहे. नुकतेच मुनावळे येथील जागतिक दर्जाच्या जलपर्यटन केंद्राचा शुभारंभ केला आहे.